## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १२०९/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.रामचंद्र परशुराम यादव,
१०१, राजवीर अपार्टमेंट, तुलसीविहार,
आसनगाव पूर्व, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय सापगांव, ता.शहापूर,
जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय सापगांव, ता.शहापूर,
जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २७/११/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ८/१२/२०२१ | ---- | २७/१/२०२२ | ७/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.४/५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २७/११/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदिश जाधव, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सापगांव उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदिश मडके, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती मुरबाड अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *अलामुरी रत्नमाला इन्सिटयूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नोलॉजी, सापगाव शहापूर जि.ठाणे महाविद्यालयाच्या बिल्डींग विषयी साईट प्लान, नकाशे, भोगवटा प्रमाणपत्र, बांधकाम पूर्णत्वाचे दाखले व संस्थेने बांधकाम करण्याविषयी वेळोवेळी आपल्या कार्यालयात सादर केलेले प्रस्ताव व कागदपत्रे विषयी. वास्तुविशारद मे.केटू आर्किटेक्टस आर्किटेक्ट श्री.सचिन कोठारी रजि.नं.सि.ए/२००/२६०४८ यांनी आपल्या कार्यालयात सदर संस्थेच्या बांधकाम विषयी दिलेले दाखले (बांधकाम पूर्णत्वाविषयी दिलेले सर्व दाखले) भोगवटा प्रमाणपत्र, साइट प्लान, बिल्डींग प्लान.*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.७/३/२०२२ रोजी, “*जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी मागणी केलेली माहिती दि.१७/३/२०२२ पर्यंत अपिलार्थी यांना विनाशुल्क देण्यात यावी.*” असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत मध्ये नाही. तत्कालिन ग्रामसेवक यांनी कार्यभार देताना अभिलेख आपणास दिलेला नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे हे निवेदन पाहता या प्रकरणाची गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांनी चौकशी करून त्यासंदर्भातील अहवाल आयोगासमोर उपस्थित राहून पुढील सुनावणीवेळी लेखी स्वरूपात सादर करावा.

२. पुढील सुनावणीस विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी आणि गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांनी स्वत: उपस्थित रहावे.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.८/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शहापूर,
ता.शहापूर जि.ठाणे

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदिश जाधव, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सापगांव व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदिश मडके, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी करचोंडे, ता.मुरबाड आणि विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.विकास जाधव, विस्तार अधिकारी, पंचायत समिती शहापूर तसेच श्री.बी.एच.राठोड, गटविकास अधिकारी पंचायत समिती शहापूर उपस्थित आहेत.

आयोगाने दि.२७/११/२०२५ रोजीच्या सुनावणीमध्ये गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांना निर्देश देण्यात आले होते की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीची नस्ती तत्कालिन ग्रामसेवक यांनी कार्यभार देताना विद्यमान ग्रामसेवक यांना हस्तांतरीत न केलेल्या बाबीची चौकशी करून अहवाल सादर करावा.

त्यानुषंगाने श्री.बी.एच.राठोड, गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांनी अहवाल सादर केला, त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, त्यांनी दोनवेळा चौकशी केली तथापि या चौकशीमध्ये त्यांना नस्ती प्राप्त होऊ शकली नाही. म्हणून त्यांनी तत्कालिन ग्रामसेवक श्री.शिवाजी बांगर यांनी दि.१६/२/२०१५ रोजी जे भोगवटा प्रामाणपत्र दिलेले आहे ते कोणत्या आधारावर दिले असा प्रश्न उपस्थित होतो असे नमूद केले आहे. त्यामुळे सदरची नस्ती श्री.बांगर तत्कालिन ग्रामसेवक यांचेकडे आहे व त्यांनी नस्ती हस्तांतरित केल्याचे निष्पन्न होत नाही. सबब श्री.शिवाजी बांगर हे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील प्रकरण सोळा संकिर्ण मधील कलम १७९ नुसार कार्यवाहीस पात्र आहेत.

गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांनी त्यांच्या अहवालात पुढे निष्कर्ष काढला की, श्री.जगदिश धाऊ मडके तत्कालिन ग्रामसेवक यांनी अपील रोजनामा व निर्णय पोहोच इत्यादीची पडताळणी प्रथम अपलीय अधिकारी तथा तत्कालिन विस्तार अधिकारी श्री.आर.बी.भोसले हे दोन्ही दिवशी गैरहजर राहिल्याने पडताळणी करता आली नाही. त्यामुळे या प्रकरणी कुठलाही निष्कर्ष देता येत नाही. श्री.मडके यांनी जन माहिती अधिकारी म्हणून जबाबादारी पार पाडली नाही.

गट विकास अधिकारी यांनी अशा प्रकारचा अहवाल सादर केल्यानंतर सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदीश जाधव यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, सदर प्रकरणाची नस्ती त्यांना आता प्राप्त झाली असून ती ग्रामपंचायतीच्या जुन्या कार्यालयात कपाटात आढळून आली आहे व या नस्तीत उपलब्ध माहिती तक्रारकर्ता यांना आता देता येईल. श्री.जगदीश जाधव यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली.

प्रकरणातील वस्तुस्थिती तपासली असता दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी दि.८/१२/२०२१ रोजी तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदीश मडके यांचेकडे माहिती अर्ज केला होता, श्री.मडके यांनी विहीत मुदतीत माहिती दिली नाही त्यामुळे तक्रारकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.७/३/२०२२ रोजी निर्णय देऊन दि.१७/३/२०२२ पर्यंत तक्राररकर्ता यांना विनाशुल्क माहिती द्यावी असे आदेश दिले. या आदेशानंतर देखील तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही आणि आज आयोगासमोर सुनावणी असल्यामुळे एक दिवस आधी ही नस्ती अचानक रित्या विद्यमान ग्रामसेवक यांना आढळून आली. म्हणजेच आतापर्यंत जाणीवपुर्वक माहिती देण्यास विलंब केलेला आहे असे निष्पन्न होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांनी दि.८/१२/२०२१ रोजी माहिती अर्ज सादर केल्यांनतर आजपावेतो ग्रामसेवक ग्रामपंचायत सापगाव ता.शहापूर जि.ठाणे या पदावर जे अधिकारी ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते ते सर्वच या विलंबासाठी जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदीश मडके, श्री.विलास पाटील, श्री.प्रशांत मारके व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदीश जाधव, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सापगाव या सर्व अधिकाऱ्यां विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२३/२/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ८ जानेवारी २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.जगदीश मडके, श्री.विलास पाटील, श्री.प्रशांत मारके व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदीश जाधव, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सापगाव **– यांना प्रत**

-- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शहापूर,
ता.शहापूर जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.** (गट विकास अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सदर आदेश बजावून पोहोच आयोगास सादर करावी.